पुढारी

# वाघ अभियांत्रिकीतर्फे 'विजिगीशा' वक्तृत्व स्पर्धा

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या आय. एस. टी. ई. विद्यार्थी विभागाच्या वतीने ११ ऑक्टोबर रोजी 'विजिगीशा-२०२५' राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

के. के. वाघ आय. एस .टी. ई. विद्यार्थी विभागास आजवर पाच वेळा 'सर्वोत्तम आय. एस .टी. ई. विद्यार्थी विभाग' म्हणून गौरवण्यात आले आहे. यामुळेच त्यांच्या वतीने आयोजित होणारी ही वक्तृत्व स्पर्धा लक्षवेधी ठरणार आहे.

दोन फेऱ्यांमध्ये स्पर्धा होणार आहे. पहिल्या फेरीत सहभागी विद्यार्थ्यांना निवडलेल्या विषयावर पूर्वतयारीसह वक्तृत्व सादर करावे लागेल. त्यानंतर निवडक वक्ते दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरतील.

स्पर्धेत सहभागासाठी ऑनलाइन नोंदणीची ८ ऑक्टोबर ही अंतिम मुदत आहे. स्पर्धा सर्व पदवी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खुली असून, भाषण मराठी अथवा इंग्रजी भाषेत करता येईल. भाषण करताना वाचण्यास परवानगी असणार नाही. उल्लेखनीय वक्त्यांना अंतिम फेरीत स्पर्धा करण्याची संधी मिळणार आहे. विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Nashik Edition

Oct 04, 2025 Page No. 02

Powered by: erelego.com